# जिल्हा परिषद भंडारा
## शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे कार्यालय

दुरध्वनी क्रमांक : (०७१८४) २५२३०४ ई-मेल आयडी - copryzp@gmail.com
(०७१८४) २५३४३० ssabhandara1@gmail.com

क्रमांक भंजिप/शिक्षण/प्राथ/कस/डे-७/ 6515 /२०२३ दिनांक : २०/१२/२०२३

प्रति,

जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी,
भंडारा.

**विषय :- जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेकरीता www.bhandarazp.org.in या संकेतस्थळावर विस्तृत जाहीरात व तद्अनुषंगीक इतर दस्तावेज प्रसिध्द करण्याबाबत.**

=====००=====००=====

जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत **जिल्हा** परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेकरीता **विस्तृत जाहीरात व तद्अनुषंगीक इतर दस्तावेज** यासोबत जोडून आपणास पाठविण्यात येत आहेत.

सदर जाहीरात वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली असुन **विस्तृत जाहीरात व तद्अनुषंगीक इतर दस्तावेज** एन.आय.सी.च्या **www.bhandara.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सहपत्र :- १) विस्तृत जाहीरात
२) आवेदन पत्र नमुना
३) करारनामा नमुना

(रवींद्र सोनटक्के)
शिक्षणाधिकारी(प्राथ.)
जिल्हा परिषद भंडारा.

प्रतिलिपी :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

शिक्षणाधिकारी(प्राथ.)
जिल्हा परिषद भंडारा.

Scanned with CamScanner

# जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेबाबत जाहिरात क्रमांक – २

दिनांक :- १८/१२/२०२३

**संस्थेचे नाव :- जिल्हा परिषद, भंडारा**

मा.उपसचिव, शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक:संकीर्ण-२०२३ /प्र.क्र.३६२/टिएनटि-१, दिनांक ०७ जुलै, २०२३ अन्वये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असल्याने "पवित्र" प्रणालीमार्फत नियमित शिक्षक भरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांतील सेवानिवृत्त शिक्षकांमधून कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद शाळांतील रिक्त शिक्षकांची पदे खालील तरतुदीप्रमाणे भरण्याबाबत कळविलेले आहे.

सदर पत्राचे अनुषंगाने, जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती संदर्भात पात्र व इच्छुक उमेदवारांकडून ऑफलाईन पध्दतीने खालील अटींच्या अधीन राहून आवेदन पत्र मागविण्यात येत आहेत.

**ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**

| ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्याचे स्थळ, वेळ व दिनांक |
|---|
| शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, भंडारा यांचे कार्यालयात (कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत) |
| दिनांक २९/१२/२०२३ पर्यंत |

भरतीप्रक्रिया स्थगीत करणे किंवा रद्य करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा उमेदवारास सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.

**अटी व शर्ती :**

१) सदर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्ष राहील.

२) मानधन रु.२०,०००/- प्रतीमाह (कोणत्याही इतर लाभाव्यतिरिक्त).

३) जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेशी करारनामा स्वाक्षरीत करणे आवश्यक राहील.

४) बंधपत्र / हमीपत्र :- नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने शिक्षकीय पदाचे विहीत काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील. करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी शर्ती मान्य असल्याबाबतचा तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, असे, बंधपत्र / हमीपत्र द्यावे लागेल.

५) भंडारा जिल्हयांतर्गत असलेल्या जिल्हा परिषदेच्या कोणत्याही तालुक्यातील संबंधित शाळेतील रिक्त शिक्षकीय पदाची गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे अत्यावश्यक असलेल्या शाळेतील रिक्त पदावर तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

६) नियुक्ती दिलेल्या शाळेत जाण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता किंवा इतर भत्ते देय असणार नाही. नियुक्ती दिलेल्या शाळेत विद्यार्थ्यांचे अध्यापन कार्याकरिता स्वतः जाणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

७) वरीलप्रमाणे करण्यात आलेली तात्पुरती नियुक्ती ही नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत किंवा वयाचे ७० वर्ष पूर्ण होईपर्यंत किंवा कार्यालयाने ठरवून दिलेल्या कालावधीपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहील.

८) पात्र व ईच्छूक सेवानिवृत्त शिक्षकांनी त्यांचे आवेदनपत्र सर्व आवश्यक दस्तावेजांसह **शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद भंडारा यांचे कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत दिनांक** . /१२/२०२३ पर्यंत सादर करावेत.

९) आवेदनपत्र सादर करावयाचा शेवटचा दिनांक :- दिनांक /१२/२०२३ पर्यंत राहील सदर दिनांकानंतर अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत किंवा प्राप्त अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

१०) उमेदवारांची निवड सेवाज्येष्ठतेप्रमाणे (सेवानिवृत्ती दिनांकाच्या ज्येष्ठतेप्रमाणे) करण्यात येईल.

११) अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची ज्येष्ठता यादी या कार्यालयाचे सूचना फलकावर दिनांक /१२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. तसेच त्याच दिवशी सायंकाळी ०५.०० वा. पर्यंत स्विकारण्यात येतील. आक्षेप निकाली काढून नियुक्तीकरीता निवड झालेल्या उमेदवारांची यादी दिनांक /१२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

१२) सदर नियुक्त उमेदवारांचे मानधन लेखाशीर्ष २२०२०१७३/१० मध्ये शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर अदा करण्यात येईल.

१३) आवेदनपत्रासोबत वैद्यकीय अधिकारी यांचे सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१४) सदर झालेली नियुक्ती सोडावयाची झाल्यास ३० दिवसांपूर्वी लेखी स्वरुपात माहिती देणे बंधनकारक राहील.

| | |
|---|---|
| - स्वा - | - स्वा - |
| **(रवींद्र सोनटक्के)** | **(समीर कुर्तकोटी)** भा.प्र.से. |
| शिक्षणाधिकारी(प्राथमिक) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| जिल्हा परिषद भंडारा | जिल्हा परिषद भंडारा |

Scanned with CamScanner

# आवेदनपत्राचा नमुना

**वैयक्तिक माहिती :-**

| | | | |
|---|---|---|---|
| अर्जदाराचे नांव | | | |
| जन्मतारीख | | संपर्क क्रमांक | |
| अर्जदाराची जात व प्रवर्ग | | लिंग | |
| शारीरिक अपंगत्व (आहे/नाही) | | असल्यास प्रकार :- | |

**इतर माहिती :-**

| | |
|---|---|
| आधार क्रमांक | |
| शिक्षक पदावरील प्रथम नियुक्तीचा दिनांक (नियुक्ती आदेशाची छयांकीत साक्षांकीत प्रत संलग्न करावी) | |
| प्रथम नियुक्तीचे पदनाम (प्राथमिक/माध्य/क.म.शिक्षक) | |
| ज्या पदावरुन सेवानिवृत्त झाले त्या पदाचे पदनाम | |
| सेवानिवृत्तीचा दिनांक :- | |
| सेवानिवृत्तीचा प्रकार :- | |
| सेवानिवृत्ती वेतन सुरु असल्याचा पुरावा(पीपीओ आदेश) | |

**पत्र व्यवहाराचा पत्ता :-**

| | | | |
|---|---|---|---|
| राज्य | | जिल्हा | |
| तालुका | | गांव | |
| ई-मेल | | | |
| मो.क्र. :- | | पिन कोड क्र.:- | |

**शैक्षणिक अर्हता :-**

| अ. क्र. | शैक्षणिक अर्हता (माध्यम) | पदवी/ पदव्युत्तर | राज्य | विद्यापीठ/ मंडळ | उत्तीर्ण महिना व वर्ष | गुण व टक्केवारी | मुख्य विषय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |

| अ. क्र. | पदवी/पदव्युत्तर | मुख्य विषय | विषय १ | विषय २ |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**व्यावसायिक अर्हता :-**

| अ. क्र. | व्यावसायिक अर्हता (माध्यम) | राज्य | विद्यापीठ/ मंडळ | उत्तीर्ण महिना व वर्ष | गुण व टक्केवारी | मुख्य विषय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

## प्रतिज्ञापत्र

मी अर्जामध्ये भरलेली उपरोक्त माहिती तपासली असून ती बरोबर असल्याची खात्री केली आहे. भरलेली माहिती व त्यासंबंधीची कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील व माझी कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात केलेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

स्थळ :- (उमेदवाराचे नांव व स्वाक्षरी)

Scanned with CamScanner

# करारनामा

(रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर सादर करावे.)

करारनामा लिहून देणार :- श्री ------------------ मु.------- ता.--- -

करारनामा लिहून घेणार :- शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद भंडारा.

मी नामे --------------------- करारनामा लिहुन देतो/देते की, माझी जिल्हा परिषद प्राथमिक/उच्च प्राथमिक शाळा ---------- पं.स.-------- येथे कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती झालेली असुन खालील अटी व शर्ती मला बंधनकारक राहतील.

**अटी व शर्ती :-**

१) माझी कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात झालेली नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची झालेली असल्यामुळे मी सदर नेमणूकीवर आपला हक्क सांगणार नाही वा नियमीत सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही.

२) माझी कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात झालेली नियुक्ती ही नियमीत शिक्षक उपलब्ध होईपर्यंत किंवा माहे एप्रिल, २०२४ पर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील.

३) मानधन रु.२०,०००/- प्रतीमाह (कोणत्याही इतर लाभांव्यतीरिक्त) राहील.

४) माझी नेमणूक ही कंत्राटी तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे माझी नियुक्ती रद्य करण्याचे अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे राखीव ठेवण्यात आलेले आहेत, याची मला जाणीव आहे.

५) एकदा कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात झालेल्या नियुक्तीने मिळालेली शाळा कोणत्याही परिस्थितीत बदलून मिळणार नाही, याची मला जाणीव आहे.

६) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने शिक्षकीय पदाचे विहीत काम पूर्ण करण्याची जवाबदारी माझी राहील.

स्थळ :-

उमेदवाराची स्वाक्षरी व नांव

दिनांक :-

Scanned with CamScanner